Train Live News Dilip Patil

11 days ago

Jalgaon आर. आर. विद्यालयात सायबर सुरक्षा विषयावर मार्गदर्शन...

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथील नेहा पाटील, जान्हवी सपकाळे, यांनी आपल्या शाळेमध्ये पाचवी ते सातवी, आणि आठवी ते दहावी अश्या दोन सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे कशाप्रकारे घडतात त्यापासून आपण कसे वाचावे, जसे की ओ.टी.पी. फ्रॉड, ए.पी.के. फाईल फ्रॉड, कोणत्याही लिंक ला क्लिक करण्याआधी ती लिंक सुरक्षित आहे का? यासाठी लिंक चा प्रोटोकॉल https असा असावा. एस. असेल तरच त्या लिंक ला क्लिक करावे, त्यांनतर नोकरीसाठी होणारे फ्रॉड, खोटे इमेल मेसेज या गोष्टींपासून आपण कशाप्रकारे सावध रहावे ह्या गोष्टींचे मार्गदर्शन करण्यात आले. आणि आपल्यासोबत एखादा सायबर फ्रॉड झाल्यास cybercrime.gov.in या पोर्टल ला त्वरित आपली तक्रार नोंदवावी. नंतर 1930 या हेल्पलाइन वर कॉल करून सायबर पोलिसला तक्रार सांगावी. यावेळी शाळेचे उपमुख्याध्यक डी.टी.पाटील सर तसेच इतर शिक्षक उपस्थित होते.
राजू आमले सर प्राध्यापक संगणकशास्त्र प्रशाळा के. बी. सी. एन. एम. यू. जळगाव तसेच क्विक हील फाउंडेशन पुणे येथील साक्षी पाटील, गायत्री केसकर, दिपू सिंग यांचे मार्गदर्शन लाभले.